# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

- कवितेचे शीर्षक : - स्वरचित
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. सुजाता कदम

शब्द तुझे सूर माझे
गीत नवे गाऊया

नव्या नव्या स्वप्नांना
उंच भरारी देऊया
तुझ्या माझ्या भाव
मनातले निरखून पाहूया
शब्द तुझे सूर माझे
गीत नवे गाऊया

नको उद्याची चिंता
हाती हात धरूया
जीवनाची गोडी अवीट
कशी ते तरी पाहूया
शब्द तुझे सूर माझे
गीत नवे गाऊया

सांग कधी येणार तू
अवघड कोडी सोडवूया
मनातल्या सुप्त भावनांना
वाट मोकळी देऊया
शब्द तुझे सूर माझे
गीत नवे गाऊया

दुःखी मनाचे दुःख
दूर ते करू आता
अवघे सुपंथ धरूया
शब्द तुझे सूर माझे
गीत नवे गाऊया

Anahat Music Therapy